# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

### शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल,जि.रायगड-४१० २०६.

ई-मेल पत्ता :- jdhe.pnvl-mah@gov.in Website: http://jdhepanvel.org

दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४५३८२०)


जा.क्र.: विससं/उशि/कोविप/शिष्यवृत्ती/२०१९/ दि.

**स्मरणपत्र-१**

**अत्यंत महत्वाचे परिपत्रक**

विषयः केंद्र शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांसाठी NSP पोर्टलवरुन महाविद्यालयांची नोंदणी करणेबाबत...

संदर्भः
१. मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं-२०१९-२०/केंद्र पुरस्कृत शिष्यवृत्ती/९६९९, दि.२०.०७.२०१९
२. या कार्यालयाचे पत्र क्र.विससं/उशि/कोविप/शिष्यवृत्ती/२०१९/, दि.२२.०७.२०१९
३. मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयातील दि.२९.०७.२०१९ रोजीचा दूरध्वनी संदेश.

केंद्र शासनाच्या एन.पी.एस. पार्टलव्दारे उच्च शिक्षण संचालनालयामार्फत **१.** केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना, **२.** महाविद्यालयीन व विद्यापीठीय विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, **३.** अपंग विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणारी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना या तीन योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येते. सदरहू योजनेची सविस्तरमाहिती संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सन २०१८-१९ मध्ये महाविद्यालय / संस्था यांचे एनएसपी पोर्टलवर दुबार नावांची नोंद असणे, महाविद्यालयांचा AISHE CODE नसणे, एकापेक्षा अधिक महाविद्यालयाचा भ्रमणध्वनी क्रमांक एकच असणे इ. कारणांमुळे महाविद्यालयांची / संस्थांची माहिती NSP पोर्टलवरुन काढण्यात आलेली असून, याबाबत अल्पसंख्यांक कार्यमंत्रालय, दिल्ली यांच्या दि.०५.०७.२०१९ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या सूचनांनुसार संस्था / महाविद्यालय यांनी करावयाच्या आवश्यक कार्यवाहीबाबत तसेच दि.२५.०७.२०१९ व दि.२६.०७.२०१९ आपणांस संदर्भ क्र.२ चे परिपत्रकानुसार कळविण्यात आले आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे संदर्भिय पत्रानुसार विहीत कालमर्यादेत महाविद्यालय/संस्था यांनी तात्काळ कार्यवाही करुन आपले महाविद्यालय/संस्था NSP Portal वर रजिस्टर्ड नसल्यास रजिस्टर्ड करुन घ्यावे व असल्यास मागील वर्षाच्या लॉगिन आयडी - पासवर्ड वापरुन लॉगीन करावे व Verification Form भरुन तो विहीत कागदपत्रांसह मा.संचालनालय, पुणे यांचेकडून पडताळणी करुन घ्यावा. अन्यथा कोणी पात्र विद्यार्थी सदर पोर्टलवर अर्ज करु न शकल्याने शिष्यवृत्तीपासून वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालय/संस्थेची राहील याची नोंद घ्यावी.

RSDhemmarkar

विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

प्रति,

**प्राचार्य/संस्था प्रमुख,**

सर्व अशासकीय अनुदानित व विना-अनुदानित, कायम विना-अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविद्यालये, जि. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.

प्रत माहितीस्तव सादरः

मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.